पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ४२ /२०१६
दिनांक : २२/०१/२०१६

प्रति,

मा.......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दिनांक **२७/०१/२०१६** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२७/०१/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – ८

दिनांक – **२७/०१/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२७/०१/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २३/१२/२०१५ व १३/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७ )** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. मा.महापालिका सभा ठराव क्रं. ४५७ दि.२०/१/२०१४ अन्वये मंजूर धोरणानूसार घटक योजना क्रं. ९ दिड वर्ष पूर्ण झालेल्या बचतगटांस अर्थसहाय्य देणे. ही योजना राबविण्यात येते. या योजने करिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिर प्रकटना नुसार अर्ज मागविणेत आले असता एकूण ७२ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची अटीशर्ती नुसार तपासणी केली असता एकूण ७२ अर्ज पात्र ठरले आहे. सदर पात्र बचतगटालाप्रत्येकी रक्कम रू २०,०००/- या प्रमाणे रक्कम रु १४,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु चौदा लाख चाळीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात “ दिड वर्ष पूर्ण झालेल्या बचतगटास अर्थसहाय्य ” या उपलेखाशिर्षावर रक्कम रु ४०,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये चाळीस लाख फक्त) इतकी तरतूद शिल्लक आहे. त्यामधून सदरचा खर्च करण्यात येईल. पात्र ठरणा-या बचतगटाला अर्थसहाय्य देणेकामी येणा-या खर्चास रक्कम रू १४,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु रु चौदा लाख चाळीस हजार फक्त) तसेच ही योजना १२ ही महिने खुली असल्यानेसन २०१५-१६ अखेर पर्यत जेवढे अर्ज प्राप्त होतील त्या बचतगटाला पात्र ठरणा-या महिला

बचतगटाला अनुदान मंजूर करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/ ४२ /२०१६
दिनांक : २२/०१/२०१६

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.